CNR No. MHRG080013332021

दाखल दिनांकः १३/१०/२०२१
नोंदणी दिनांकः १३/१०/२०२१
निकाल दिनांकः १३/०८/२०२६
कालावधी - वर्षे महिने दिवस
०४ १० ००

(भाग ''अ'')

न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, न्यायालय क्र.०२, खालापूर यांचे न्यायालयात

(पिठासीन अधिकारी – दिपाली एस. खोत यांचे समक्ष)

**संक्षिप्त फौजदारी खटला क्र. ६७८/२०२१** **निशाणी क्र. ५०/ब**
**गु.र.नं. २३२/२०२१**

**महाराष्ट्र शासन,**
द्वारा पोलीस निरीक्षक,
खालापूर पोलीस ठाणे,
ता. खालापूर, जि. रायगड. ... **अभियोग पक्ष** ...

विरूध्द

**धनंजय मार्तंड गटे,**
वय – ३८ वर्षे, व्यवसाय – चालक,
रा. धौंडमळ, शिंदेवाडी, घोडेगाव,
ता. आंबेगाव, जि. पुणे. ... **आरोपी** ...

---

**विधिज्ञांची नावे** – सरकारतर्फे विधिज्ञ श्रीमती पी. टी. बुये.
आरोपीतर्फे विधिज्ञ श्री. सत्यवान तु. वाडेकर.

---

## (भाग ''ब'')

| | |
|---|---|
| अपराधाचा दिनांक | ११/०९/२०२१ |
| फिर्याद दिनांक | ११/०९/२०२१ |
| दोषारोपपत्र दाखल दिनांक | १३/१०/२०२१ |
| दोषारोप ठेवल्याचा दिनांक | १३/१२/२०२४ |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | १४/०१/२०२५ |
| न्यायनिर्णय राखीव ठेवण्याचा दिनांक | -- |
| न्यायनिर्णयाचा दिनांक | १३/०८/२०२६ |
| शिक्षा घोषीत केल्याचा दिनांक, असल्यास | -- |

| **अ. क्र.** | **आरोपीचे नाव** | **अटक दिनांक** | **जामीनावर सोडल्याचा दिनांक** | **अपराधाचे कलम** | **शिक्षा दिली किंवा निर्दोष मुक्तता** | **शिक्षेचा तपशील** | **फौ.प्र.सं. कलम ४२८ अन्वये सुट देणेकामी कोठडीतील कालावधी** |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | धनंजय मार्तंड गटे | २०/०९/२०२१ | २०/०९/२०२१ | भारतीय दंड विधान कलम २७९, ३३७, ३३८ व मोटार वाहन कायदा कलम १८४ प्रमाणे. | निर्दोष मुक्त | -- | -- |

# (भाग ''क'')

## अभियोग पक्ष / आरोपी / न्यायालय यांचे साक्षीदारांचा तपशील :–

### अभियोग पक्षाचे साक्षीदार

| अ. क्र. | साक्षीदारांचे नावे | | निशाणी क्रमांक |
|---|---|---|---|
| १. | अश्वीनी संदेश गोडवे | फिर्यादी | १३ |
| २. | गणेश बाबुराव देशमुख | साक्षीदार | १५ |
| ३. | नागेश पंढरीनाथ ठोंबरे | पंच | १८ |
| ४. | आसिफ सलीम सय्यद | पंच | २२ |
| ५. | जनार्दन अनंता देशमुख | साक्षीदार | २३ |
| ६. | संदेश अशोक गोडवे | जखमी | २५ |
| ७. | रमेश गणपत उघडा | तपासी अंमलदार | ३७ |

### आरोपी पक्षाचे साक्षीदार

| अ.क्र. | साक्षीदारांचे नावे | निशाणी क्रमांक |
|---|---|---|
| | ---- | -- |

### न्यायालयाचे साक्षीदार

| अ.क्र. | साक्षीदारांचे नावे | निशाणी क्रमांक |
|---|---|---|
| | ---- | -- |

**अभियोग पक्ष / आरोपी / न्यायालय यांचे कागदपत्रांचा तपशील** :–

**अभियोग पक्षाचे कागदपत्र**

| अ. क्र. | तपशील | निशाणी क्रमांक |
|---|---|---|
| १. | जबाब | १४ |
| २. | घटनास्थळ पंचनामा | १९ |
| ४. | ६५–ब चे प्रमाणपत्र | ३८ |
| ५. | वाढीव कलम लावल्याबाबत अहवाल | ३९ |
| ६. | उप प्रादेशिक परीवहन अधिकारी यांना दिलेले पत्र | ४० |
| ७. | एम.जी.एम. हॉस्पीटल, वाशी यांना जखमींचे प्रमाणपत्र मिळण्याकामी दिलेले पत्र | ४१ |
| ८. | साई हॉस्पीटल, चौक यांना जखमींचे प्रमाणपत्र मिळण्याकामी दिलेले पत्र | ४२ |
| ९. | वैद्यकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र, चौक यांना जखमींचे प्रमाणपत्र मिळण्याकामी दिलेले पत्र | ४३ |
| १०. | आरोपीला मोटार वाहन कायदा कलम २०९ प्रमाणे दिलेली नोटीस | ४४ |
| ११. | आरोपीला फौजदारी प्रक्रिया संहीता कलम ४१–अ प्रमाणे दिलेली नोटीस | ४५ |
| १२. | अटक पंचनामा | ४६ |

**आरोपी पक्षाचे कागदपत्र**

| अ.क्र. | तपशील | निशाणी क्रमांक |
|---|---|---|
| | ---- | -- |

**न्यायालयाचे कागदपत्र**

| अ.क्र. | तपशील | निशाणी क्रमांक |
|---|---|---|
| | ---- | -- |

**मुद्देमालाचा तपशील** :-

| अ.क्र. | तपशील | निशाणी क्रमांक |
|---|---|---|
| | -- | -- |

:: **न्यायनिर्णय** ::

( घोषित दिनांक : १३/०८/२०२६ )

१. आरोपीविरुध्द भारतीय दंड विधान संहिता कलम २७९, ३३७, ३३८ व मोटार वाहन कायदा कलम १८४ प्रमाणे खटला चालविण्यात आला.

**अभियोग पक्षाचा खटला थोडक्यात खालीलप्रमाणे,**

२. अभियोग पक्षाचे थोडक्यात कथन असे की, फिर्यादी अश्वीनी संदेश गोडवे रा. ए.-२०३, यशोवर्धन सोसायटी, प्लॉट क्र. ३५, सानपाडा पोलीस स्टेशनच्या जवळ, नवी मुंबई येथील रहीवासी आहे. फिर्यादी वरील ठिकाणी राहणारी असून तेथे फिर्यादी त्यांचे पती संदेश गोडवे, सासरे अशोक गोडवे, सासु विमला गोडवे, मुलगा सिवांश गोडवे असे एकत्र कुटूंबात राहत असुन फिर्यादीचे पती पुणे येथे Accenture या कंपनी

मध्ये नोकरीस असून त्यातून येणा–या पगारातुन त्यांची ते उपजिवीका करतात. तसेच दि. ०१ सप्टेंबर रोजी फिर्यादीची आजी मयत झाली असुन फिर्यादी त्यांचे पती व मुलगा असे पुणे येथील सावरगाव येथे गेले होते. दि. ११/०९/२०२१ रोजी दुपारी ०१:०० वा. च्या सुमारास ते त्यांच्या घरी सानपाडा, नवी मुंबई येथे जाण्यासाठी त्यांचे ओळखीचे धनंजय गटे रा, घोडेगाव यांची इको कार क्र. एम.एच. १४ जे.एम. ९०५४ अशी स्वतःची असल्याने त्याची गाडी भाड्याने करुन सानपाडा येथे जात होते. त्या गाडीमध्ये फिर्यादी त्यांचे पती संदेश व फिर्यादीचा मुलगा असे बसले होते व चालक धनंजय गटे हा गाडी चालवत होता. त्यानंतर ते पुणे वरुन येवून खाली खोपोली येथे आल्यानंतर पुणे–मुंबई जुना रस्ता एन.एच. ०४ या रस्त्याने सानपाडा, नवी मुंबई येथे जात असताना पद्मावती पेट्रोलपंप येथे विणेगाव जवळ सायंकाळी ०४:१५ वा. च्या सुमारास आलेवेळी गाडी वेगात असल्याने गाडी स्लीप होवून रस्त्याचे उजवे बाजुस असलेल्या सिमेंटच्या डिव्हायडरला जोरात ठोकर लागून गाडी पलटी होवून अपघात झाला असून सदर अपघातामध्ये फिर्यादीचे पती संदेश गोडवे यांचे मानेला व कमरेला, छातीला मुक्का मार लागला तसेच दुखापत झालेली आहे. तसेच फिर्यादीला डोक्याला किरकोळ दुखापत झालेली आहे. मुलास कोणत्याही प्रकारची दुखापत झालेली नाही. तसेच चालक यास सुध्दा दुखापत झालेली आहे. सदरच्या अपघातामध्ये इको कार वरील चालक धनंजय गटे रा. घोडेगाव, ता. आंबेगाव याने गाडी स्पीडमध्ये चालविलेमुळे झालेला आहे. म्हणून फिर्यादीने त्याच्या विरुध्द खालापूर पोलीस ठाणे येथे फिर्याद दिली.

३. वरील नमूद फिर्याद प्रमाणे गुन्हा रजि. नं. २३२/२०२१ हा नोंद करण्यात आला व सदर गुन्ह्याचा तपास तपासी अंमलदार पोलीस नाईक रमेश गणपत उघडा यांनी केला. तपासादरम्यान त्यांनी घटनास्थळ पंचनामा केला, घटनास्थळाचे फोटो काढले, साक्षीदारांचे जबाब नोंदवले, गुन्ह्यात वाढीव कलम लावल्याबाबत न्यायालयाला अहवाल दिला, ईको कारची आर.टी.ओ. कडून तपासणी करुन घेतली,

एम.जी.एम. हॉस्पीटल वाशी, साई हॉस्पीटल, चौक, प्राथमिक आरोग्य केंद्र, चौक यांना जखमींचे वैद्यकीय प्रमाणपत्र मिळणेकामी पत्र देवून वैद्यकीय प्रमाणपत्र प्राप्त करुन घेवून दोषारोप पत्रात सामील करुन घेतले, आरोपीला नोटीस दिल्या, त्यानंतर आरोपीला अटक केली. तपासादरम्यान आरोपीविरुध्द सबळ पुरावा मिळून आल्याने न्यायालयात दोषारोपत्र पाठवले.

४. माझे पुर्वाधिकारी यांनी निशाणी क्र. १० प्रमाणे आरोपीविरुध्द भारतीय दंड विधान संहिता कलम २७९, ३३७, ३३८ व मोटार वाहन कायदा कलम १८४ प्रमाणे गुन्ह्याचा तपशिल दिनांक १३/१२/२०२४ रोजी नोंदविला. सदरचा गुन्ह्याचा तपशील आरोपीस त्याच्या बोलीभाषेमध्ये समजावून सांगण्यात आला. त्यानुसार आरोपीचे निवेदन नोंदविण्यात आले. आरोपीने गुन्हा नाकबूल करुन संपरिक्षेची मागणी केली. त्याप्रमाणे खटल्याचे संपरिक्षण पार पाडण्यात आले. आरोपीचे फौजदारी प्रकिया संहिता कलम ३१३ नुसार चे निवेदन निशाणी क्र. ४७ वर नोंदविण्यात आले. त्यामध्ये आरोपीने खोटी केस त्याच्या विरुध्द केली असल्याचा बचाव घेतला आहे.

५. सुविद्य सरकारी वकील तसेच आरोपीच्या वकीलांचा युक्तीवाद ऐकला. सरकारी पक्षाने दिलेल्या पुराव्यावरुन तसेच आरोपी विरुध्द ठेवण्यात आलेल्या गुन्हयाच्या तपशिलाचा विचार करता खालील मुद्दे माझ्या समोर निर्णयासाठी उपस्थित झाले. त्याकरिता सदर मुद्यावर माझी उत्तरे कारणांसहित पुढील प्रमाणे नमूद करत आहे.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **उत्तरे** |
|---|---|---|
| १. | सरकारी पक्षाने असे शाबित केले का की, दिनांक ११/०९/२०२१ रोजी १६:१५ वाजताचे सुमारास मौजे विणेगावचे हद्दीत, पुणे मुंबई एन.एच. ०४ जुन्या हायवेवर, पद्मावती पेट्रोल पंपाचे समोर रोडवर, ता. खालापूर जि. | **नकारार्थी** |

| | | |
|---|---|---|
| | रायगड येथे घडला असून आरोपीने त्याच्या ताब्यातील इको कार क्र. MH-14 J.M. 9054 ही वर नमूद ठिकाणी आलेवेळी अतिवेगाने, निष्काळजीपणे धोकादायक स्थितीत, हयगयीने, बेदरकारपणे रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करुन चालविल्याने त्याचा वाहनावरील ताबा सुटल्याने वाहन रस्त्याचे डावे बाजुस असलेल्या सिमेंटच्या डिव्हायडरला जोरात ठोकर लागून वाहन रस्त्यावर पलटी होवुन अपघात केला व त्याद्वारे **भारतीय दंड विधान कलम २७९** अन्वये गुन्हा केला आहे काय? | |
| २. | सरकारी पक्षाने असे शाबित केले का की उपरोक्त तारखेस, वेळी व ठिकाणी आरोपीने त्याच्या ताब्यातील नमुद वाहन हे मानवी जितीत धोक्यात येईल व इतरांची व्यक्तीगत सुरक्षितता धोक्यात येईल इतक्या बेदरकारपणे व हयगयीने चालवून अपघात करुन स्वतःचे व फिर्यादी सौ. अश्वीनी गोडवे तसेच साक्षीदार संदेश गोडवे यांना किरकोळ स्वरुपाच्या दुखापतीस पोहचवल्या व त्याव्दारे **भारतीय दंड विधान कलम ३३७** अन्वये गुन्हा केला आहे काय? | **नकारार्थी** |
| ३. | सरकारी पक्षाने असे शाबित केले का की उपरोक्त तारखेस, वेळी व ठिकाणी आरोपीने त्याच्या ताब्यातील नमुद वाहन हे मानवी जितीत धोक्यात येईल व इतरांची व्यक्तीगत सुरक्षितता धोक्यात येईल इतक्या बेदरकारपणे व हयगयीने चालवून अपघात करुन साक्षीदार संदेश गोडवे यांना लहान मोठ्या गंभीर स्वरुपाच्या दुखापतीस पोहचवल्या व त्याव्दारे **भारतीय दंड विधान कलम ३३८** अन्वये गुन्हा | **नकारार्थी** |

| | | |
|---|---|---|
| | केला आहे काय? | |
| ४. | सरकारी पक्षाने असे शाबित केले का की उपरोक्त तारखेस, वेळी व ठिकाणी आरोपीने त्याच्या ताब्यातील वरील वाहन हे रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करुन भरधाव वेगाने हयगयीने किंवा अविचाराने रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करुन मानवी जीवीतास धोका निर्माण होईल अथवा जनतेस धोकादायक ठरेल किंवा सुरक्षेस धोका निर्माण होईल अशी कृती केली व त्याद्वारे **मोटार वाहन कायदा कलम १८४** अन्वये गुन्हा केला आहे काय? | **नकारार्थी** |
| ५. | आदेश काय? | **आरोपीला निर्दोष मुक्त करण्यात येते** |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र. १ ते ४ करिता –**

६. वरील मुद्दे क्र. १ ते ४ एकमेकांशी सलंग्न असल्यामुळे कथनांची पुनरावृत्ती टाळण्याकरिता एकत्रीतपणे चर्चेला घेतलेले आहेत.

७. आरोपीवर असा आरोप ठेवण्यात आला आहे की, दिनांक ११/०९/२०२१ रोजी १६.१५ वाजताचे सुमारास मौजे विणेगावचे हद्दीत, पुणे मुंबई एन.एस.०४ जुन्या हायवेवर, पद्मावती पेट्रोल पंपाचे समोर रोडवर, ता. खालापूर जि. रायगड येथे घडला असून आरोपीने त्याच्या ताब्यातील इको कार क्र. MH-14 J.M.9054 ही वर नमूद ठिकाणी आलेवेळी अतिवेगाने, निष्काळजीपणे धोकादायक स्थितीत, हयगयीने, अविचाराने, बेदरकारपणे रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करुन चालवून त्याचा वाहनावरील ताबा सुटल्याने वाहन रस्त्याचे डावे बाजुस असलेल्या सिमेंटच्या डिव्हायडरला जोरात ठोकर मारुन वाहन रस्त्यावर पलटी होवुन अपघात

करुन वाहनाचे नुकसानीस कारणीभुत झाला तसेच स्वतःचे व फिर्यादी सौ. अश्वीनी गोडवे यांना किरकोळ स्वरुपाच्या दुखापतीस पोहचवल्या व साक्षीदार संदेश गोडवे यांना लहान मोठ्या गंभीर स्वरुपाच्या दुखापतीस पोहचवल्या.

८. साक्षीदार क्र. १ अश्वीनी संदेश गोडवे या फिर्यादी आहेत. त्यांनी त्यांच्या पुराव्यात असे सांगितले आहे की, दिनांक ११/०२/२०२१ रोजी त्या त्यांचे पती संदेश व मुलगा शिवांश सावरगाव वरुन सानपाडा येथे ईको कारने येत होते. त्या कारचा क्रमांक एमएच १४ जे.एम. ९०५४ असा होता व ती गाडी धनंजय गटे म्हणजे तुम्ही चालवित होते. ते पुणे–मुंबई जुण्या महामार्गावरुन येत असताना पद्मावती पेट्रोल पंपाजवळ तुम्ही गाडी वेगाने चालवित असल्यामुळे गाडी स्लीप झाली व ती उजव्या बाजूच्या सिमेंटच्या डीव्हायडरवर धडकली व पलटी झाली, ती वेळ दुपारी ०४:१५ वा. ची होती. त्यांच्या पतीच्या मानेला, खांद्याला व छातीला मुक्का मार लागला. त्यांना थोडीशी दुखापत झाली. तसेच, धनंजय गटे यांनाही मार लागला. त्यानंतर पोलीस तेथे आले व त्यांनी त्यांना ओम साई हॉस्पीटल मध्ये नेले. त्यांच्या पतीला जास्त मार लागला असल्यामुळे त्यांना एम.जी.एम. हॉस्पीटल येथे नेले होते. त्या दवाखाण्यात उपचार घेत असताना पोलीसांनी त्यांचा जबाब नोंदवून घेतला होता. आरोपीला त्या ओळखतात. सदर साक्षीदाराने त्याच्या उलटतपासामध्ये कबूल केले आहे की, घटना पावसाळ्यातील आहे. ईको कार मध्ये ड्रायव्हरच्या बाजुला एक सीट, ड्रायव्हरच्या मागे एक सीट व त्या समोर अजुन एक सीट असते. त्या ड्रायव्हरच्या मागे सीटवर बसल्या होत्या. त्या ज्या ठिकाणी बसल्या होत्या तेथुन गाडीचे स्पीडोमीटर बरेच दुर होते. त्यांना तेथुन गाडीचे स्पीडोमीटर दिसत नव्हते. त्यांनी फिर्याद देताना गाडीचा वेग किती होता हे पोलीसांना सांगितलेले नाही. गाडी स्लीप झाल्यामुळे अपघात झाला आहे. रस्त्यावर तेल सांडले असल्यास गाडी स्लीप होवू शकते. त्यांनी फिर्याद देताना चालक बेधडकपणे रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करुन गाडी चालवित होता असे सांगितले नव्हते. पुणे–मुंबई रस्त्यावर वाहनांची सतत

वर्दळ असते. दवाखान्यामध्ये त्यांचा जबाब नोंदवून घेतला त्यावेळी तेथे पोलीस व त्यांचे नातेवाईक हजर होते. अपघातामुळे डिव्हाईडरचे नुकसान झाले होते किंवा नाही हे त्या सांगू शकत नाहीत.

९. साक्षीदार क्र. २ गणेश बाबुराव देशमुख हे साक्षीदार आहेत. त्यांनी त्यांच्या पुराव्यात असे सांगितले आहे की, दिनांक ११/०९/२०२१ रोजी गणपतीचा उत्सव सुरु असल्यामुळे ते कलोते वरुन चौक येथे ईको गाडीने जात होते. त्यांच्या गाडीच्या समोर एक ईको गाडी होती. विनेगावच्या समोर पद्मावती पेट्रोल पंपाजवळ समोरच्या ईको गाडीचा अपघात झाला. ती गाडी रस्त्यावरील दुभाजकाला धडकली होती. त्यामध्ये चालकासह चार लोक होती. त्या गाडीचा क्रमांक एम.एच. १४ जे.एम. ९०५४ असा होता. त्यांनी त्यांची गाडी थांबवली व जावून पाहिले असता, त्या गाडीमध्ये कार चालक, एक महीला, एक पुरुष व एक लहान मुल होते. त्यानंतर त्यांनी पोलीसांना फोन केला. त्यानंतर ५ ते १० मिनीटात पोलीस तेथे आले. त्यानंतर जखमींना चौक येथील दवाखाण्यात नेले. त्या गाडीतील महिला व पुरुषाला मार लागलेला होता. पुरुषाला कंबरेला व छातीला मार लागलेला होता. चौक येथील साई हॉस्पीटल येथे त्यांना नेले होते. डॉक्टरांनी त्यांना तपासल्यानंतर त्यांना ॲम्ब्ल्युलन्सद्वारे एम.जी.एम. हॉस्पीटल येथे पाठविले. त्यानंतर १४ तारखेला पोलीसांनी त्यांना चौक येथील पोलीस ठाण्यात बोलावले होते व त्यांचा जबाब नोंदवला. ते ईको कारच्या चालकाला पाहील्यास ओळखू शकतात. त्याचे नाव त्यांना माहित नाही. सदर साक्षीदाराने त्याच्या उलटतपासामध्ये कबूल केले आहे की, सप्टेंबर मध्ये पावसाळ्याचे दिवस असतात. त्यांची गाडी साधारण ज्या वेगाने जात होती त्याच वेगाने समोरची गाडी जात होती. पनवेल कडे जात असताना ड्रायव्हरची उजवी बाजू डिव्हायडरच्या बाजूने होती. त्यांच्या जबाबामध्ये गाडी डाव्या बाजूस असलेल्या सिमेंटच्या डिव्हायडरवर चढली असे लिहीलेले आहे. सदर मजकूर चुकीचा लिहीला आहे. त्यांच्या व समोरच्या गाडीमध्ये अंतर होते. ते त्यांच्या गाडीमध्ये समोरच्या सीटवर

बसले होते. अपघातामुळे डिव्हायडरचे नुकसान झाले होते व डिव्हायडर फुटले. त्यांच्या गाडीमध्ये ते व कार चालक जनार्दन असे दोघेच होते. पुणे मुंबई हा रस्ता सतत वर्दळीचा रस्ता आहे. पेट्रोल पंपावर पेट्रोल भरण्यासाठी वाहनांची गर्दी असते. अपघात झाल्यानंतर गाडी डिव्हाडरमध्ये जाउन पडलेली नव्हती.

१०. साक्षीदार क्र. ३ नागेश पंढरीनाथ ठोंबरे हे पंच आहेत. त्यांनी त्यांच्या पुराव्यात असे सांगितले आहे की, दिनांक १२/०९/२०२१ रोजी पोलिसांनी त्यांना चौक पोलिस चौकी येथे बोलावून अपघात स्थळी पंचनामा करायला जायचे आहे असे सांगितले. त्यानंतर ते, दुसरा पंच, धनंजय गटे व पोलिस असे पद्मावती पेट्रोल पंपाच्या समोर विनेगाव येथे गेले. सदर घटनास्थळ हे जुना मुंबई–पुणे हायवेवर मुंबई पुणे लेनवर आहे. घटनास्थळ धनंजय गटे याने दाखविले. त्या ठिकाणी रस्त्याच्या बाजुला ईको गाडी क्रमांक एम.एच.१४ जे.एम. ९०५४ ही गाडी उभी होती व सदर गाडीचे पत्रा व काच फुटलेले होते. रस्त्यावर जोरात ब्रेक मारल्याचे टायरचे निशाण होते. गाडीच्या इंजिनला तसेच ड्रायव्हर सीटला मार लागलेला होता व पत्रा चपलेला होता. त्यानंतर पोलिसांनी त्यांच्या समक्ष पंचनामा तयार केला, तसेच नकाशा काढला व नंतर त्यांनी त्यावर सह्या केल्या होत्या. घटनास्थळाच्या पूर्वेला मुंबई पुणे हायवे व त्या पलिकडे पद्मावती पेट्रोल पंच, पश्चिमेला मोकळी जागा व दक्षिण व उत्तरला मुंबई पुणे हायवे आहे. पंचनामा सकाळी ०९:०० ते १०:०० या वेळेत करण्यात आला. ज्याने घटनास्थळ दाखवले त्या धनंजय गटेला पाहील्यास ते ओळखू शकतात. सदर साक्षीदाराने त्याच्या उलटतपासामध्ये कबूल केले आहे की, ते गणेश बाबुराव देशमुख यांना ओळखत नाही. ते दवाखाण्यात अपघात कोणाचा झाला हे पाहायला गेलो असता तेथील पोलिस अधिका–यांनी त्यांना पंच म्हणून हजर राहण्याकरीता येण्यास सांगितले. मुंबई–पुणे हायवे वर मधात रस्ता दुभाजक आहे. घटनास्थळ हे मुंबई पुणे लेनवर दाखविलेले नाही.

पंचनाम्यामध्ये अपघात मुंबई पुणे लेनवर झाला असे कोठेही लिहीलेले नाही.

११. साक्षीदार क्र. ४ आसिफ सलीम सय्यद हे पंच आहेत. त्यांनी त्यांच्या पुराव्यात असे सांगितले आहे की, दिनांक १२/०९/२०२१ पोलिसांनी त्यांना पद्मावती पेट्रोल पंपाच्या समोर पंचनामयासाठी बोलविले होते. त्या ठिकाणी एक ईको गाडी जिचा क्रमांक ९०५४ असा आहे ती पुणेकडे जाणाऱ्या रस्त्यावर उभी होती. गाडीच्या काचा फुटलेल्या होत्या तसेच बोनट डॅमेज झाले होते. तसेच डिव्हायडर तुटलेले होते. पोलिसांनी घटनास्थळाची पाहणी करुन निशाणी क्र.१९ वरील पंचनामा तायार केला व त्यांची सही घेतली तसेच पंचनामा करते वेळी घटनास्थळाचे ६ फोटो घेतले होते.

१२. साक्षीदार क्र. ५ जनार्दन अनंता देशमुख हे साक्षीदार आहेत. त्यांनी त्यांच्या पुराव्यात असे सांगितले आहे की, दि. ११/०९/२०२१ रोजी ते इको गाडीने सामान घेवून चौक येथे जात असताना पद्मावती पेट्रोल पंपाजवळ एक गाडी भरधाव वेगात जात होती व ती स्लीप झाली व तिची टक्कर डिव्हाईडरला लागल्यानंतर ती पलटी झाली ती गाडी पांढ–या रंगाची ईको गाडी होती. तिचा नंबर एम.एच. १४ जे.एम. ९०५४ असा होता. त्या गाडीमध्ये एक महिला, एक पुरुष व एक लहान मुल होते. त्यांना जखमा झाल्या होत्या. त्यांनी त्यांना साई हॉस्पीटल, चौक येथे उपचाराकरीता नेले ती गाडी कोण चालवित होते हे त्यांना माहित नाही. त्या गाडीच्या चालकालाही दुखापत झाली होती. सदर साक्षीदाराने त्याच्या उलटतपासामध्ये कबूल केले आहे की, घटनेच्या वेळी पावसाळ्याचे दिवस होते. रस्त्यावर बारीक खडी असल्यामुळे पावसाळ्याच्या दिवसात गाडी स्लीप होवून अपघात होतात. अपघात त्यांच्या समक्ष झाला नाही. त्यांना जात असताना गर्दी दिसल्यामुळे ते थांबले होते. त्यांनी अपघात घडताना प्रत्यक्ष पाहीला नाही त्यामुळे तो कोणाच्या चुकीमूळे झाला हे ते सांगू शकत

नाहीत.

१३. साक्षीदार क्र. ६ संदेश अशोक गोडवे हे जखमी आहेत. त्यांनी त्यांच्या पुराव्यात असे सांगितले आहे की, ते सानपाडा येथे त्यांचे आई–वडील, पत्नी व मुलगा यांच्यासह राहण्यास आहेत. ते ॲसेंचर या कंपनीमध्ये नोकरी करतात. ते आरोपीला ओळखतात. आरोपी त्यांचे नातेवाईक निलेश काळे यांच्या गाडीवर ड्रायव्हर म्हणून काम करत असल्यामुळे ते त्यांना ओळखतात. दिनांक ०१/०९/२०२१ रोजी त्यांची आजी सावरगाव, पुणे येथे मयत झालेली असल्याने ते त्यांची पत्नी व मुलगा असे ते सावरगांव, पुणे येथे गेले होते. ते १० दिवस तेथेच थांबले त्यानंतर दिनांक ११/०९/२०२१ रोजी त्यांनी सावरगांव पुणे येथून मुंबईला येण्यासाठी त्यांचे नातेवाईक निलेश काळे यांना विनंती केली की, त्यांच्या गाडीने त्यांना नवी मुंबई पर्यंत सोडा. त्यांची गाडी ईको कंपनीची होती तिचा क्र.एम.एच.१४/जे.एम.९०५४ असा होता. त्यावेळी निलेश काळे यांनी धनंजय गटे यांना नवी मुंबई पर्यंत कार मधून सोडण्यास सांगितले. ईको कार मध्ये मधल्या सिटवर ड्रायव्हरच्या पाठीमागे त्यांची पत्नी, तिच्या बाजुला त्यांचा मुलगा व मुलाच्या बाजूला ते बसले होते. प्रवास चालू असतांना आरोपी गाडी वेगात चालवत असल्याचे त्यांना जाणवले होते. त्यावेळी त्यांनी दोन ते तीन वेळा आरोपीला गाडी हळू चालवा अशी विनंती केली होती. तरीपण आरोपीने तसे केले नाही. त्यानंतर सायंकाळी ०४:०० वाजण्याच्या सुमारास खालापूर हद्दीत पद्मावती पेट्रोल पंपाजवळ आलेले असतांना आरोपीने त्याच्या ताब्यातील कार वेगात चालवून दुभाजकला धडक दिली. दुभाजकास धडक दिल्यामुळे गाडी हवेत उडाली व ते गाडीतून बाहेर फेकले गेले. तसेच त्यांचा मुलगा दुभाजकाच्या मध्ये असणाऱ्या गवतामध्ये पडला होता, त्यांची पत्नी देखील रस्त्यावर पडली. त्यानंतर ते बेशुध्द झाले. अपघातामध्ये त्यांना दोन्ही खाद्यांना, कमरेला व डोक्याला मार लागला

होता. त्यांच्या पत्नीला देखील डोक्याला मार लागला होता तसेच मुक्का मार देखील लागला होता. त्यानंतर जमलेल्या लोकांनी त्यांना उपचाराकरिता साई हॉस्पीटल चौक येथे ॲडमिट केले, तेथील डॉक्टरांनी त्यांना तपासून सांगितले की, तेथे त्यांचावर उपचार होवू शकत नाहीत, गंभीर दुखापत झालेली असल्यामुळे पुढील उपचार एम.जी.एम.हॉस्पीटल वाशी येथे घ्या. त्यानंतर ते एम.जी.एम. हॉस्पीटल वाशी येथे ५ दिवस ॲडमिट होते. तेथे त्यांच्या उजव्या खांद्याचे ऑपरेशन करुन त्यामध्ये सळई टाकून हाड डॉक्टरांनी जोडले. सदर अपघातामध्ये त्यांचा मोबाईलचे तसेच ऑफिसने दिलेल्या लॅपटॉपचे नुकसान झाले. अपघाताची खबर त्यांच्या पत्नीने पोलीस स्टेशनमध्ये दिली होती. पोलीसांनी त्यांच्याकडे चौकशी केली होती. त्यांचा जबाब नोंदविला होता. आरोपीला पाहिल्यास त्या ओळखू शकतात. सदर साक्षीदाराने त्याच्या उलटतपासामध्ये कबूल केले आहे की, दिनांक १०/०९/२०२१ रोजी गणपती बसल्यानंतर ते दिनांक ११/०९/२०२१ रोजी सावरगांव येथून निघाले. त्यावेळी पावसाळ्याचे दिवस होते. त्या दिवशी पाउस नव्हता. पुणे जिल्ह्याच्या तुलनेत रायगड जिल्ह्यामध्ये पावसाचे प्रमाण जास्त असते किंवा कसे हे ते सांगू शकत नाही. ते कारमध्ये चालकाच्या बाजूला बसले नव्हते. ड्रायव्हर सीट पासून त्यांच्या सीट मधील अंतर अंदाजे दोन फुट असेल. ड्रायव्हर सिटच्या मागे मधला रो होता. त्यांनी त्यांचा जबाब नोंदवितेवेळी पोलीसांना त्यावेळी त्यांना गाडीचा स्पीडो मिटर दिसत होता हे सांगितले नव्हते. त्यांनी त्यांचा जबाब नोंदवितेवेळी त्यांनी दोन ते तीन वेळा आरोपीला गाडी सावकाश चालविण्यास सांगितल्याचे सांगितले नव्हते. त्यांनी त्यांचा जबाब नोंदवितेवेळी पोलीसांना दुभाजकास धडक दिल्यामुळे गाडी हवेत उडाली व ते गाडीतून बाहेर फेकले गेले, तसेच त्यांचा मुलगा दुभाजकाच्या मध्ये असणाऱ्या गवतामध्ये पडला होता, तसेच त्यांची पत्नी देखील रस्त्यावर पडली हा मजकूर सांगितला नव्हता. सदरचा मजकूर ते आज न्यायालयात प्रथमच सांगत आहे. अपघात झाल्यानंतर जोराचा आवाज

झाला. जोराचा आवाज झाल्यानंतर त्यांना अपघात झाल्याचे समजले. अपघातनंतर ते लगेच बेशुध्द झाले व त्यांना हॉस्पीटलमध्ये नेण्यात आले. ते एम.जी.एम. हॉस्पीटल वाशी येथे असतांना त्यांना शुध्द आली. पोलीस त्यांचा जबाब घेण्यासाठी एम.जी.एम. हॉस्पीटलमध्ये आले होते. त्यांना तारीख आठवत नाही. ते अपघातानंतर किती दिवसांनी आले असतील ते त्यांना आठवत नाही. त्यांच्या म्हणण्या प्रमाणे ईको कारमध्ये चालकाच्या सिटच्या पाठीमागे समोरा समोर सीट नव्हत्या. ड्रायव्हरच्या सीटच्या पाठीमागे सिंगल सिट नव्हती, चालकाच्या पाठीमागील रोमध्ये तीन लोक बसतील अशी आडवी रो होती. त्यावेळी गाडीच्या काचा बंद होत्या. या केसचे कागदपत्र प्रथम खबर अहवाल वगैरे त्यांनी मेडीक्लेम मिळण्यासाठी दाखल केलेले आहेत. त्यांची मेडीक्लेम पॉलीसी कंपनीतर्फे कॅशलेस होती त्यामुळे त्यांनी कागदपत्रांची वाट पाहिली नव्हती.

१४. साक्षीदार क्र. ७ रमेश गणपत उघडा हे तपासीक अंमलदार आहेत. त्यांनी त्यांच्या पुराव्यात असे सांगितले आहे की, दिनांक ११/०९/२०२१ रोजी फिर्यादी अश्वीनी संदेश गोडवे यांनी दिलेला जबाब त्यांनी ओम साई हॉस्पीटल चौक, ता. खालापूर येथे जावून नोंदविला. त्यानूसार गुन्हा रजि. नं.२३२/२०२१ हा नोंद करण्यात आला. त्यानंतर दिनांक १२/१२/२०२१ रोजी पो.हवा. हिंदोडा यांनी घटनास्थळाचा पंचनामा पंचासमक्ष केला. घटनास्थळ हे विणेगांव जवळील पद्मावती पेट्रोल पंपाच्या समोर पुणे मुंबई ए.एच. ४ हायवे रोडवर उजव्या बाजूस सिमेंटच्या डिव्हायडर जवळ होते, पंचनाम्याच्यावेळी घटनास्थळ आरोपीने दाखविले. पंचनाम्याच्यावेळी त्यांनी त्यांच्या वापरत्या मोबाईलमध्ये घटनास्थळाचे फोटो काढले होते. त्यानंतर त्यांनी सदरचे फोटो लॅपटॉपमध्ये घेवून त्याची कलर प्रिंटरवर प्रिंट काढली. त्यांना फोटो काढण्यापासून ते त्याची प्रिंट काढण्यापर्यंतच्या पुर्ण प्रक्रियेची

माहिती आहे. त्यानंतर त्यांनी त्यांचे ६५–ब नूसारचे प्रमाणपत्र दोषारोप पत्रात सामिल करुन घेतले. त्यानंतर सदर गुन्ह्याचा तपास त्यांच्याकडे देण्यात आला. तपासादरम्यान त्यांनी साक्षीदारांचे जबाब नोंदविले. त्यानंतर त्यांनी वाढीव कलम लावण्याबाबत न्यायालयाला अहवाल दिला. त्यानंतर त्यांनी अपघातातील इको कार क्र.एम.एच.१४/जे.एम.९०५४ या वाहनाची उपप्रादेशीक परिवहन अधिकारी यांच्याकडून तपासणी करुन घेतली. त्यानंतर त्यांनी तांत्रीक तपासणी अहवाल प्राप्त करुन घेवून दोषारोप पत्रात सामिल करुन घेतला. त्यानंतर त्यांनी एम.जी.एम. हॉस्पीटल वाशी यांना जखमींचे प्रमाणपत्र मिळण्याकामी पत्र दिले. त्यानंतर त्यांनी वैद्यकिय प्रमाणपत्र प्राप्त करुन घेवून दोषारोप पत्रात सामिल करुन घेतले. त्यांनतर त्यांनी साई हॉस्पीटल चौक यांना जखमींचे वैद्यकिय प्रमाणपत्र मिळण्याकामी पत्र दिले. त्यानंतर त्यांनी वैद्यकिय प्रामणपत्र प्राप्त करुन घेवून दोषारोप पत्रात सामिल करुन घेतले. त्यानंतर त्यांनी वैद्यकिय अधिकारी प्राथमिक आरोग्य केंद्र चौक यांना जखमीचे वैद्यकिय प्रमाणपत्र मिळण्याकामी पत्र दिले. त्यानंतर त्यांनी वैद्यकिय प्रामणपत्र प्राप्त करुन घेवून दोषारोप पत्रात सामिल करुन घेतले. त्यानंतर त्यांनी आरोपीला मो.वा.का. कलम २०९ प्रमाणे व सी.आर.पी.सी. कलम ४१–अ प्रमाणे नोटीसा दिल्या. त्यानंतर त्यांनी आरोपीचा वाहन चालविण्याचा परवाना, विमा पॉलिसीचे कागदपत्र, आर.सी.बुकची प्रत दोषारोप पत्रात सामिल करुन घेतली. तपासादरम्यान त्यांनी दिनांक २०/०९/२०२१ रोजी आरोपीला अटक केली होती. त्यांनी केलेल्या एकंदरीत तपासामध्ये असे निष्पन्न झाले की, पांढऱ्या रंगाची ईको कार क्र.एम.एच.१४/जे.एम.९०५४ वरील चालक धनंजय गटे म्हणजे आरोपीने त्याच्या ताब्यातील वाहन पुणे ते मुंबई एन.एच.४ जुन्या हायवेने घेवून जात असतांना खालापूरच्या हद्दीत पदमावती पेट्रोल पंपाच्या समोर आल्यावर त्याने त्याच्या ताब्यातील वाहन हयगयीने, अविचारने, बेदरकारपणे, रस्त्याच्या परिस्थीतीकडे दुर्लक्ष करुन

चालवून आरोपीचा वाहनावरील ताबा सुटल्याने सदरचे वाहन रस्त्याच्या उजव्या बाजूस जावून सिमेंटच्या डिव्हायडरला जोरात ठोकर मारुन वाहन रस्त्यावर पल्टी होवून अपघात झाला व सदर अपघातामध्ये अश्वीनी गोडवे यांना किरकोळ दुखापत व साक्षीदार संदेश गोडवे यांना गंभीर दुखापत होवून व तुमच्या स्वतःच्या किरकोळ दुखापतीस कारणीभूत होवून वाहनाच्या नुकसानीस कारणीभूत झाला म्हणून त्यांनी आरोपी विरुध्द दोषारोप पत्र पाठविले. आरोपीला पाहिल्यास ते ओळखू शकतात. सदर साक्षीदाराने त्याच्या उलटतपासामध्ये कबूल केले आहे की, ते अपघाताचे प्रत्यक्षदर्शी साक्षीदार नाहीत. फिर्यादीने फिर्याद देतेवेळी चालकाचा वाहनावरील ताबा सुटला असे सांगितले नव्हते. फिर्यादीने जबाब देतेवेळी गाडी स्लीप होवून रस्त्याच्या उजव्या बाजूस असलेल्या डिव्हायडरला ठोकर लागून अपघात झाला असे सांगितलेले आहे. जखमी संदेश गोडवे यांने त्याच्या जबाबात चालकाचा गाडीवरील ताबा सुटल्यामुळे अपघात झाला असे सांगितलेले नाही. घटना पावसाळ्याच्या दिवसात घडलेली आहे. पावसाळ्याच्या दिवसात रस्त्यावर ऑईल सांडल्यामुळे किंवा रस्त्यावर बारीक रेती असल्यास वाहन स्लीप होवून अपघात होतात. एखादे वाहन कंट्रोल करायचे असल्यास चालक ब्रेक दाबतो व त्यामुळे टायरचे निशाण रस्त्यावर पडतात. पंचनाम्याच्यावेळी घटनास्थळावर ब्रेक मारल्याच्या खुणा दिसत होत्या. ज्यावेळी एखादे वाहन डिव्हायडरला ठोकर मारते त्यावेळी डिव्हायडर तुटतो. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे ईको कारची दुभाजकाला ठोकर लागून अपघात झाला होता. घटनास्थळ पंचनाम्यामध्ये दुभाजक तुटल्याचे कुठेही नमुद नाही. तपासाच्याकामी ज्यावेळी पोलिस स्टेशनमधून बाहेर पडायचे असते त्यावेळी तशी नोंद स्टेशन डायरीला करावी लागते. दिनांक १२/०९/२०२१ रोजी ते, पो.हवा.हिंदोळा व आरोपी धनंजय गटे असे घटनास्थळ पंचनाम्यासाठी पोलिस स्टेशनमधून बाहेर पडले हे दाखविणारा कागदोपत्री पुरावा त्यांनी दोषारोप पत्रासोबत दाखल केलेला नाही. त्यांच्याकडे फोटोग्राफिचे शिक्षण

घेतल्याबाबतचे प्रमाणपत्र नाही. मोबाईल मधून डायरेक्ट फोटो संगणकामध्ये घेता येत नाहीत, त्यासाठी ब्ल्युटूथ किंवा यु.एस.बी.केबल वापरावी लागते. मोबाईल मधून फोटो संगणकामध्ये घेण्यापासून ते त्याची प्रिंट निघे पर्यंतची सर्व प्रक्रिया त्यांनी प्रमाणपत्रामध्ये नमूद केलेली नाही. मो.वा.का.कलम– २०९ व सी.आर.पी.सी.कलम ४१–अ ची नोटीस त्यांनी आरोपीला एकाच दिवशी व एकाचवेळी दिलेली आहे. त्यानंतर त्यांनी त्याची नोंद जावक रजिष्टरला लगेच केली. मो.वा.का.कलम २०९ ची नोटीस पहिल्यांदा द्यावी लागते व त्यानंतर सी.आर.पी.सी.कलम ४१ अ ची नोटीस दिली जाते. मो.वा.का.कलम २०९ च्या नोटीसचा जावक क्र.४५९/२०२१ असा असून सी.आर.पी.सी.कलम ४१ अ च्या नोटीसचा जावक क्र.१६४/२०२१ असा आहे. दोन्ही नोटीसच्यामध्ये जवळ–जवळ २०० जावक नंबर पडलेले आहेत. निशाणी क्र.४४ व ४५ वरील चारही सह्या आरोपीने केलेल्या आहेत. निशाणी क्र.४४ व ४५ वरील पहिली व दुसरी सही यामध्ये फरक आहे. वाहन तपासणी अहवालामध्ये अपघात कशामुळे झाला याबाबत मत नोंदविण्यात आलेले नाही. त्यांनी इको कार मालकाचा जबाब नोंदविलेला नाही. फिर्यादी व जखमी यांनी अपघाताच्यावेळी ईको कारचा स्पीड किती होता याबाबत काहीही सांगितले नव्हते. फिर्यादी तसेच जखमी यांनी त्यांच्या जबाबामध्ये ईको कार चालकाने त्याच्या ताब्यातील कार रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करुन हयगयीने अविचाराने चालवली असे सांगितलेले नाही. फिर्यादी ईको कारमध्ये चालकाच्या पाठीमागिल सिटवर बसलेली होती.

१५. अभिलेखावरील सर्व पुराव्याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, फिर्यादीने तिच्या पुराव्यामध्ये हे मान्य केले आहे की, गाडी स्लीप झाल्यामुळे अपघात झालेला आहे व रस्त्यावर तेल सांडले असल्यास गाडी स्लीप होवू शकते. फिर्यादीने हे देखील मान्य केले आहे की, तिने फिर्याद देताना चालक बेधडकपणे

रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करुन गाडी चालवित होता असे सांगितले नव्हते. फिर्यादीने तिच्या पुराव्यामध्ये ईको कार उजव्या बाजुच्या सिमेंटच्या डीव्हाईडरवर धडकली असे सांगितले आहे. जखमी साक्षीदार क्र. ६ यांनी त्यांच्या पुराव्यामध्ये असे सांगितले आहे की, दुभाजकास धडक दिल्यामुळे गाडी हवेत उडाली, ते गाडीतुन बाहेर फेकले गेले, त्यांचा मुलगा दुभाजकामध्ये असणा–या गवतामध्ये पडला होता, त्यांची पत्नी देखील रस्त्यावर पडली. परंतु सदरची बाब साक्षीदार क्र. ६ यांच्या पोलीसांसमोरील जबाबात नमूद नाही. तसेच या बाबी फिर्यादी यांनी देखील त्यांच्या पुराव्यात सांगितलेल्या नाहीत. यावरुन असे दिसून येते की, साक्षीदार क्र. १ व साक्षीदार क्र. ६ यांच्या पुराव्यामध्ये विसंगतता आहे. साक्षीदार क्र. ६ यांनी हे देखील मान्य केले आहे की, त्यांनी त्यांचा जबाब नोंदवताना पोलीसांना त्यावेळी त्यांना गाडीचा स्पीडोमीटर दिसत होता असे सांगितले नव्हते. त्याच प्रमाणे साक्षीदार क्र. ६ यांनी त्यांच्या पुराव्यात असे सांगितले आहे की, त्यांनी आरोपीला दोन ते तीन वेळा गाडी हळू चालवा अशी विनंती केली होती. परंतु सदर बाब देखील साक्षीदार क्र. ६ यांच्या पोलीसांसमोरील जबाबात नमूद नाही. साक्षीदार क्र. ६ यांनी हे मान्य केले आहे की, जोराचा आवाज झाल्यानंतर त्यांना अपघात झाल्याचे समजले. साक्षीदार क्र. १ व ६ यांच्या पुराव्यामध्ये विसंगतता आहे. साक्षीदार क्र. २ यांनी त्यांच्या पुराव्यामध्ये हे मान्य केले आहे की, त्यांची गाडी साधारण ज्या वेगाने जात होती त्याच वेगाने समोरची गाडी जात होती. साक्षीदार क्र. २ यांच्या म्हणण्याप्रमाणे पनवेल कडे जात असताना ड्रायव्हरची उजवी बाजु डीव्हायडरच्या बाजुने होती. परंतु या साक्षीदाराच्या पोलीसांसमोरील जबाबामध्ये गाडी डाव्या बाजुस असलेल्या सिमेंटच्या डीव्हाईडरवर चढली असे नमूद केलेले आहे. यावरुन असे दिसून येते की, या साक्षीदाराची साक्ष व पोलीसांसमोरील जबाब यामध्ये विसंगतता आहे. साक्षीदार क्र. २ यांच्या म्हणण्यानुसार अपघातामुळे डिव्हाईडरचे नुकसान झाले होते व डिव्हाईडर फुटला होता परंतु सदरची

बाब निशाणी १९ वरील पंचनाम्यामध्ये कोठेही नमूद नाही. साक्षीदार क्र. ३ यांनी त्यांच्या पुराव्यामध्ये घटनास्थळ जुना मुंबई पुणे लेनवर आहे असे सांगितले आहे. परंतु निशाणी १९ वरील पंचनाम्यामध्ये घटनास्थळ मुंबई–पुणे लेनवर कोठेही दाखविण्यात आलेले नाही. तसेच पंचनाम्यामध्ये अपघात मुंबई–पुणे लेनवर झाला असे कोठेही लिहीण्यात आलेले नाही. सदर अपघात हा पुणे–मुंबई लेनवर झालेला आहे. परंतु साक्षीदार क्र. ३ यांनी अपघात पुणे लेनवर झाला असे सांगितले आहे. साक्षीदार क्र. ४ यांनी त्यांना पंचनाम्याच्यावेळी डीव्हाईडर तुटलेले दिसल्याचे सांगितले आहे. परंतु डिव्हाईडर तुटल्याची बाब पंचनाम्यामध्ये नमूद नाही. साक्षीदार क्र. ५ यांनी अपघात त्यांच्या समक्ष झाला नसल्याचे मान्य केले आहे. तसेच अपघात त्यांनी प्रत्यक्ष पाहीला नसल्यामुळे तो कोणाच्या चुकीमूळे झाला हे ते सांगू शकत नाहीत असे सांगितले आहे. तसेच गाडी कोण चालवित होते हे त्यांना माहित नाही असे सांगितले आहे. साक्षीदार क्र. ५ यांनीही हे मान्य केले आहे की, रस्त्यावर बारीक खडी असल्यामुळे पावसाळ्याच्या दिवसात गाडी स्लीप होवून अपघात होतात. तपासी अंमलदार यांनी त्यांच्या पुराव्यामध्ये हे मान्य केले आहे की, फिर्यादीने फिर्याद देतेवेळी चालकाचा वाहनावरील ताबा सुटला असे कोठेही सांगितलेले नाही. तसेच जखमीने देखील त्याच्या जबाबात चालकाचा गाडीवरील ताबा सुटल्यामुळे अपघात झाला असे कोठेही सांगितलेले नाही. तपासी अंमलदार यांनी देखील हे मान्य केले आहे की, पावसाळ्याच्या दिवसात रस्त्यावर ऑईल सांडल्यामुळे किंवा रस्त्यावर बारीक रेती असल्यास वाहन स्लीप होवून अपघात होतात. या प्रकरणामध्ये घटनास्थळ पंचनामा करणारे पोलीस हवालदार हिंदोळा यांना साक्षीदार म्हणून तपासण्यात आलेले नाही. तपासी अंमलदार यांनी ईको कार मालकाचा जबाब नोंदवलेला नाही. साक्षीदार क्र. १ व ६ यांच्या पुराव्यामध्ये विसंगतता दिसून येते त्यामुळे अभियोग पक्षाच्या कथनाविषयी संशय निर्माण होतो. त्यामुळे संशयाचा फायदा आरोपीला देऊन त्याला निर्दोष मुक्त करणे न्यायोचित ठरेल.

सबब मी मुद्दा क्र.१ ते ४ चे निष्कर्ष नकारार्थी देऊन मुद्दा क्र. ५ च्या निष्कर्षाप्रत खालील आदेश पारीत करत आहे.

**<u>आदेश</u>**

१. आरोपी नामे **धनंजय मार्तंड गटे** यांची भारतीय दंड विधान संहिता कलम २७९, ३३७, ३३८ व मोटार वाहन कायदा कलम १८४ प्रमाणे आरोपातून फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २५५(१) नुसार निर्दोष मुक्त करण्यात येत आहे.

२. आरोपीचा जामीनपत्र रद्द करण्यात येते.

३. आरोपीने अपिलीय न्यायालयात हजर राहणेकरिता रक्कम रू.१५,०००/– वैयक्तिक जातमुचलका फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७–अ अन्वये सादर करावा.

**(निकाल खुल्या न्यायालयात अधिघोषित करण्यात आला.)**

Digitally signed by DIPALI SUBHASH KHOT
Date: 2026.08.13 17:57:16 +0530

**(श्रीमती डी. एस. खोत )**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
न्यायालय क्र.२, खालापूर.

स्थळ – खालापूर.
दिनांक – १३/०८/२०२६